**सन २०१६-१७ या वित्तीय वर्षांसाठी “मागेल त्याला शेततळे” योजनेकरिता निधी रोहयो विभागाकडे वर्ग करण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-एससीवाय-०५/२०१६/प्र.क.३७/म-११,**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक:-१० मे, २०१६.

**वाचा:-** १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.४.२०१५.
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१६/प्र.क्र.४२/ब-१, दि.१.४.२०१६.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दि.२०.४.२०१६.
४) संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कृषि आयुक्तालय यांचे पत्र क्र.मृदसं/ मृद-४/मागेल त्याला शेततळे/निधी/८७२/२०१६, दि.२०.४.२०१६.

**प्रस्तावना :-**

राज्यात गेल्या काही वर्षात पावसाचे प्रमाण कमी तसेच अनिश्चित झाले आहे. त्यामुळे कोरडवाहू क्षेत्रातील पुर्णत: पावसावर अवलंबून असलेल्या पिकांवर तसेच त्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. त्याकरिता **“मागेल त्याला शेततळे”** ही योजना राज्यात कार्यान्वीत करण्यात आली आहे. सदर सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता रोहयो विभागाने निधीची मागणी केली आहे. हा निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०१६-१७ या वित्तीय वर्षांमध्ये “मागेल त्याला शेततळे” ही योजना कार्यान्वीत करण्याकरिता ज्या लाभार्थ्यांचे अर्ज शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करीत आहेत किंवा पात्र ठरले आहेत. त्यांना निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता रोहयो विभागाने रु.१५०.०० कोटी इतक्या निधीची मागणी केली आहे. हा निधी रोहयो विभाग यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तो त्यांनी तात्काळ आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वितरीत करावा.

२. सन २०१६-१७ या चालू वित्तीय वर्षात मागणी क्र.सी-९, ४२५०, इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च, १०१, नैसर्गिक आपत्ती, ०१, दुष्काळ प्रतिबंधक उपाययोजना या अंतर्गत मागेल त्याला शेततळे (४२५०ए००७) (योजनेतर), ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या उपलेखाशिर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानामधून **रु.१५०,००,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे पन्नास कोटी फक्त)** इतका निधी रोहयो विभागाकडे सुपूर्द करण्यात येत आहे. रोहयो विभागाने सदर खर्च वर नमूद केलेल्या लेखाशिर्षामधून भागवावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकावा. उपरोक्त लेखाशिर्षाला वित्त विभागाने सहमती दर्शविलेली असून, महालेखापाल (नागपूर) यांची अंतिम मान्यता प्राप्त होणे बाकी आहे.

३. **<u>सदर निधी चालू आर्थिक वर्षातच खर्च होणे आवश्यक असून, तो व्यपगत होणार नाही अथवा अनावश्यक रितीने कोषागारातून आहरीत करुन तो बँकेत काढून ठेवला जाणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्यात यावी. अशी बाब गंभीर अनियमितता समजली जाईल व संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.</u>**

४. रोहयो विभागाने सदर निधीपैकी किती निधी, कोणत्या उपाययोजनांवर किती खर्च करण्यात आला आहे/करण्यात येणार आहे, याबाबतची विभागनिहाय /जिल्हानिहाय आणि उपाययोजनानिहाय माहिती पुढील मागणी सोबत सादर करावी. तसेच यापुढे करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे स्वरुप व कालावधी स्पष्टपणे नमुद करावा. अन्यथा अशी त्रुटीपुर्ण मागणी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे, याची रोहयो विभागाने खातरजमा करावी व हा निधी अन्य उपाययोजनांसाठी व बाबींवर खर्च होणार नाही याचीही रोहयो विभागाने दक्षता घ्यावी.

६. ज्या प्रयोजनासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे. याबाबतची जिल्हानिहाय प्रगतीची माहिती रोहयो विभागाने या विभागाकडे दर महिन्यास मासिक खर्चाच्या अहवालासोबत सादर करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेख/ नोंदवहया विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरीत व वितरीत करणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अदयावत ठेवण्यात यावेत. त्याचप्रमाणे दरमहा होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचे पत्रक पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यत रोहयो विभागाने एकत्रितरित्या न चुकता सादर करावीत. दर तीन महिन्यांनी झालेल्या खर्चाची, महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्षता नियंत्रण अधिकाऱ्यांनी घ्यावी.

७. नियंत्रक अधिकाऱ्यांनी अनुदान वाटपाची एक प्रत सचिव (मदत व पुनर्वसन ) यांना न चुकता सादर करावी, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोपागार/उपकोपागार यांजकडे पाठविण्यात येणाऱ्या बिलासोबत जोडल्या जाणाऱ्या कॉम्प्युटर स्लिममध्ये गौण/उपशिर्पाच्या " संगणक" संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा, असे आदेश कृपया संबंधित अधिकाऱ्यांना नियंत्रण अधिकाऱ्यांनी दयावेत. तसेच कोपागारातून/उपकोपागारातून आहरीत केलेल्या रकमेचा अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०५१११५४८५७९११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Chaaya Kiran Wadte

Digitally signed by Chaaya Kiran Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Chaaya Kiran Wadte
Date: 2016.05.11 15:51:42 +05'30'

**( छा. कि. वडते )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
२) मा.मंत्री (महसूल/मदत व पुनर्वसन), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
३) मा.मंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
४) मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
५) सचिव, रोहयो विभाग, मंत्रालय , मुंबई -३२.
६) सचिव (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई-३२,
७) आयुक्त (कृपि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९) कोपागार अधिकारी (सर्व)
१०) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (प्रत्येकी ३ प्रती)
११) संचालक, लेखा व कोपागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ०२३.
१२) वित्त विभाग (अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-६/व्यय-९/व्यय-३/अर्थोपाय कक्ष/वित्त आयोग कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२
१३) कार्यासन अधिकारी (ब-१/म-७/पीएसी/पीएसी-१ कार्यासने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१४) कार्यासन अधिकारी (रोहयो-५), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१५) निवडनस्ती, कार्यासन म-११, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.